Form : 1-A

# FIRST INFORMATION REPORT

पहिली खबर

(Under Section 154 Cr. P.C.)

(फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये)

No. 0056706

1. *Dist. / जिल्हा: गडचिरोली *P.S. / पोलीस ठाणे: भामरागड *Year / वर्ष: 2023 *FIR No. / पहिली खबर क्र.: 03/2023 *Date / तारीख: 12/04/2023

2. (i) *Act / अधिनियम - अत्याचार प्रतिबंधक अधिनियम *Sections / कलमे: 7

(ii) *Act / अधिनियम: — *Sections / कलमे: —

(iii) *Act / अधिनियम: — *Sections / कलमे: —

(iv) *Other Acts & Sections / इतर अधिनियम व कलमे: —

3.(a) *Occurence of Offence / अपराधाची घटना: *Day / वार: बुधवार *Date from / तारीख पासून: 29/03/023 *Date To / तारीख पर्यंत: 12/04/2023

*Time Period / वेळेचा अवधी: *Time From / पासून: 13.09 *Time To / पर्यंत: 13.15 वा.

(b) Information received at P.S. Date / पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याची तारीख: 12/04/2023 *Time / वेळ: 16.50 वा

(c) General Diary Reference Entry No. (s) / सर्वसाधारण रोजनिशीचा संदर्भ क्रमांक: 28/2023 *Time / वेळ: 16.50 वा.

4. Type of information / माहितीचा प्रकार: लाच लुचपत प्रतिबंधक *Written / Oral / लेखी/तोंडी: लेखी

5. Place of Occurrence : (a) * Direction and Distance from P.S. / पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर ........ Beat No. / गस्तक्षेत्र क्र. ........

घटनेचे ठिकाण मौजा - भामरागड येथील वस्तीगृहातील विश्राम कक्ष - 500 मिटर उत्तर

(b) *Address / पत्ता: ता. भामरागड ता. भामरागड जि. गडचिरोली

(c) *In case outside limit of this Police Station, then the

या पोलीस ठाण्याच्या हद्दीच्या बाहेर असल्यास, त्या पोलीस ठाण्याचे नाव

Name of P.S. / पोलीस ठाणे: — Dist. / जिल्हा: —

6. Complainant /Informant :

तक्रारदार / खबरी

(a) Name / नाव: रमेश कोहारे

(b) Father's/ Husband's Name / पित्याचे / पतीचे नाव: गिरजुजी कोहारे

(c) Date/Year of Birth / जन्म तारीख / वर्ष: 39 वर्ष (d) Nationality / राष्ट्रीयत्व: भारतीय

(e) Passport No. / पारपत्र क्र.: — Date of Issue / दिल्याची तारीख: — Place of Issue / दिल्याचे ठिकाण: —

(f) Occupation / व्यवसाय: कंत्राटी चौकीदार

(g) Address / पत्ता: समग्र शिक्षा अभियान होस्टेल भामरागड

ता. भामरागड जि. गडचिरोली.

फिर्याद

दिनांक १२/०४/२०२३

नांव :– श्री. रमेश गिंजूजी कोठारे, वय ३९ वर्षे, जात–तेली, धंदा– कंत्राटी चौकीदार, समग्र शिक्षा अभियान होस्टेल भामरागड मु.पो.ता. भामरागड जि.गडचिरोली मो.नं.९४०४९२२१४५

मी दिनांक २८/०३/२०२३ रोजी श्री शिवाजी राठोड, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली यांचे समक्ष लोकसेवकांविरूद्ध लाच मागणी संबंधाने तक्रार नोंदविली. श्री शिवाजी राठोड, पोलीस निरीक्षक यांनी माझे सांगण्याप्रमाणे माझी तक्रार सहीनिशी घेतली आहे. मी दिलेली तक्रार खालीलप्रमाणे आहे.

मी सन २०२२मध्ये जिल्हा परिषद गडचिरोली मार्फत समग्र शिक्षा अभियान होस्टेल,भामरागड येथे ११ महिण्याचे कंत्राटी चौकीदार पद भरणे असल्याने अर्ज केला होता. त्यामध्ये माझी कंत्राटी चौकीदार म्हणुन निवड होवुन नेमणुक झाल्याने माहे ऑगस्ट/२०२२ पासुन कंत्राटी चौकीदार म्हणुन काम करीत होतो. त्यादरम्यान मलादरमहा ६०००/– रू. पगार माझे बॅक खात्यात जमा होत होते. त्यानंतर माहे जानेवारी/२०२३ पासुन माझे पगारात ३,०००/– रू. वाढकरण्यात आली म्हणून मला आता ९००० रुपये दरमाह मिळत आहे.

दिनांक २६/०३/२०२३ रोजी मीहोस्टेल मध्ये डयुटीवर असतांनातेथील अधिक्षक/मुख्याध्यापक श्री. अवथरे सर यांनी मला कॅबीनमध्ये बोलावुन,''आता तुझ्या पगारात दरमहा ३०००/– रू. वाढ झाली आहे, ही वाढ माझ्यामुळे झाली आहे, म्हणून मला ५०००/– रू. दयावे लागेल, असे म्हणाले. तेव्हा मी ''सर माझे पगारात फक्त तिनच हजार रूपये वाढले आहे, माझे एवढया कमी पगारात भागत नाही व आता माझ्याकडे एवढे पैसे नाही'' असे म्हणालो. तेव्हा अधिक्षक/मुख्याध्यापक श्री. अवथरे सर यांनी, ''ते काही नाही तुला ५०००/– रू. दयावेच लागेल, नाहीतर तुला पुढे कंत्राटी पदावर पुन्हा ठेवता येणार नाही'', तेव्हा मी घाबरून ''ठिक आहे सर, सध्या माझ्या कडे एवढे पैसे नाहीत, मी पैसे जमवुन भेटतो असे म्हणालो, तेव्हा त्यांनी ठिक आहे, पैसे जमल्यानंतर होस्टेलला येवुन कॅबीनमध्ये भेट'' असे म्हणुन मला पैशाची मागणी केली आहे. त्याचप्रमाणे ईतर कंत्राटींना सुध्दा पैशाची मागणी केली असल्याचे माझेसोबत कंत्राटी म्हणून लागलेल्या कोमटी तेलामी यांनी मला सांगितले.

श्री.अवथरे सर, अधिक्षक/मुख्याध्यापक, समग्र शिक्षा अभियान होस्टेल भामरागड यांनी मला होस्टेल मधील कॅबीनमध्ये बोलावुन दरमहा ३०००/– रू. पगार वाढ केल्याचा मोबदला व कंत्राटी चौकीदार पदावर नियीमत ठेवण्याच कामाकरीता ५,०००/–रू. लाच रक्कम मागणी केली आहे. माझी श्री. अवथरे सर, अधिक्षक/मुख्याध्यापक, समग्र शिक्षा होस्टेल भामरागड यांना ५०००/– रू. लाच रक्कम देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने मी रु. ५,०००/– घेऊन आपले कार्यालयामार्फत कारवाई होणेकरीता स्वेच्छेने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली येथे तक्रार देण्यास आलो.

श्री. अवथरे सर, अधिक्षक/मुख्याध्यापक, समग्र शिक्षा अभियान होस्टेल भामरागड जि. गडचिरोली यांचेशी माझे कोणतेही वैयक्तीक वैर नसुन आर्थिक देवाण–घेवाण/उसणवारी अथवा भांडण नाही. म्हणुन मी त्यांचेविरुध्द कायदेशिर कारवाई करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार देत आहे. मी सोबत आणलेले रु. ५,०००/– हे माझे वैयक्तिक बचतीतील आहेत.

श्री. शिवाजी राठोड, पोलीस निरीक्षक यांनी दोन शासकिय पंचांना पाचारण करुन त्यांची व माझी ओळख करून दिली. श्री शिवाजी राठोड साहेब यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझ्या स्वहस्ताक्षरात दिलेला तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिले. त्यानंतर सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री शिवाजी राठोड यांनीसुद्धा स्वाक्षरी केली.

पोलीस निरीक्षक श्री शिवाजी राठोड यांचे सुचनेवरून पोना श्रीनिवास संगोजी यांनी व्हॉईस रेकॉर्डर कश्याप्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती देवुन लाच मागणीची पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री शिवाजी राठोड यांनी माझेकडुन सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम रू. ५,०००/– (५००/–रू. दराच्या १० चलनी नोटा) घेतले. त्यानंतर सदरच्या नोटांचे कमांक नोंदवुन घेण्यात आले व सदरच्या नोटांना ॲथ्रॅसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म व प्रात्यक्षीक करून दाखवुन लाचेच्या रक्कमेस ॲथ्रॅसिन पावडर लावली व याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी राठोड यांनी पंचनामा कं. १ मध्ये घेतल्या आहेत.

दिनांक २९/०३/२०२३ रोजी पडताळणी व सापळा कारवाई करण्याकरीता पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी राठोड यांनी कळविल्याने, लाचलचुपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली येथील पोलीस निरीक्षक श्री शिवाजी राठोड, शासकिय पंच व स्टाफसह शासकिय वाहनाने मौजा भामरागड येथे पोहोचुन पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी राठोड यांनी मला फोन लावुन फॉरेस्ट रेस्टहाउस येथे बोलाविल्याने मी त्याठिकाणी हजर झालो. त्यानंतर मला पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन माझी अंगझडती घेवुन व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमोरी कार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच कं. १ यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे ताब्यात देवुन मला पंच कं. १ यांचे सह माझे स्वत:चे दुचाकी वाहन क. एमएच

Signature

**Form : 1-B**

7. Details of known/ suspected/ unknown accused with full particulars :
माहित असलेल्या/ संशयीत/ माहित नसलेल्या आरोपीचा संपूर्ण तपशील :
(Attach separate sheet, if necessary)
(आवश्यक असल्यास, स्वतंत्र कागद जोडावा)

No. 0056706

आरोपी – भिमराव उद्धव आवचरे वय-५३ वर्षे
पद – अधिक्षक वर्ग ३ समग्र शिक्षा अभियान वस्तीगृह
भामरागड रा. भामरागड ता. भामरागड जि. गडचिरोली.

Physical features, deformities and other details of the suspect :
संशयितांची शारीरिक ठेवण, व्यंग आणि इतर तपशील :

| *Sex लिंग | *Date/Year of Birth जन्मतारीख/ वर्ष | *Build बांधा | *Height in Cms. उंची (सें. मी. मध्ये) | *Complexion वर्ण | *Identification Mark(s) ओळख |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| — | — | — | — | — | — |

| *Deformities/Peculiarities व्यंग / वैशिष्ट्ये | *Teeth दात | *Hair केस | *Eye डोळे | *Habit(s) सवयी | *Dress Habits पोशाखाच्या सवयी |
|---|---|---|---|---|---|
| (7) | (8) | (9) | (10) | (11) | (12) |
| — | — | — | — | — | — |

| * Languages/Dialect भाषा / बोली भाषा | PLACE OF | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | *Burn Mark भाजल्याची खूण | *Leucoderma कोड | *Mole तीळ | *Scar व्रण | *Tattoo गोंदण |
| (13) | (14) | (15) | (16) | (17) | (18) |
| — | — | — | — | — | — |

These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect. This will be used only for the purpose of preliminary retrieval to assist I. O.
जर तक्रारदार/ खबरीने संशयीत बद्दल वरील १ किंवा अधिक रकान्यातील माहिती दिली तरच भरावी. तपास अधिकाऱ्याने प्राथमिक पातळीवर तपास करण्यासाठी वरील माहिती उपयोगात आणावी.
A database created will subsequently link one suspect in several cases, if any.
या अनुषंगाने तयार झालेल्या माहितीचा उपयोग संशयीताचा इतर गुन्ह्यातील सहभाग स्पष्ट करेल.
A comprehensive and complete data on all fields will again be prepared when any accused is arrested irrespective of previous suspicion.
वरील रकान्यातील संपूर्ण माहिती ज्यावेळी संशयीतास अटक करण्यात येईल त्यावेळी पुनःश्च तयार करावी.

३३/एक्स ८७०७ ने गैरअर्जदारास भेटण्यास मौजा भामरागड येथील समग्र शिक्षा अभियान होस्टेलचे कॅबीनमध्ये भेटण्याकरीता पाठविण्यात आले.

तेव्हा गैरअर्जदार श्री. अवथरे सर हे समग्र शिक्षा होस्टेलचे कॅबीनमध्ये हजर मिळुन आल्याने त्यांना भेटलो व हातांने ईशारा करून स्वयपांकी तेलामीला फोन लावून बोलावुन त्याचेकडुन माझे समक्ष नमुद कामाचे पैसे घेवुन मला पगार वाढ केल्याचा मोबदला व कंत्राटी चौकीदार पदावर नियीमत ठेवण्याचे कामाकरीता रू. ५,०००/– लाच रक्कम परवा दिनांक ३१/०३/२०२३ रोजी होस्टेलमध्य घेण्याची समंती दर्शविल्याने मी पंच कं. १ सह पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी राठोड यांचेकडे परत गेलो असता, पंच कं. १ यांच्या आवाजानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आले.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी राठोड यांनी पंच कं. १ व २ यांचेसमक्ष व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले संभाषण एकुन व पंच क्र.१ यांचे घडलेल्या परिस्थीतीच्या कथनावरून श्री अवथरे सर यांनी मला पगार वाढ केल्याचा मोबदला व कंत्राटी चौकीदार पदावर नियीमत ठेवण्याचे कामाकरीता रू. ५,०००/– लाच रक्कमेची परवा दिनांक ३१/०३/२०२३ रोजी होस्टेलमध्ये स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची खात्री केली. त्यावरून श्री अवथरे सर यांचे विरुध्द परवा दिनांक ३१/०३/२०२३ रोजी सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. पंडताळणी व सापळा स्थगीती पंचनामा क्र.२ मध्ये सविस्तर नोंद घेण्यात आली आहे.

दिनांक ३१/०३/२०२३ रोजी सापळा कारवाई करण्याकरीता पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी राठोड यांनी मला भामरागड येथे येत असल्याचे फोनव्दारे कळविल्याने, मी त्यांना श्री. अवथरे सर हे सुटटीवर गेले असल्याने, सर आल्यानंतर तुम्हाला फोन करून कळविल्या नंतर हजर या, त्यानंतर दिनांक ११/०४/२०२३ रोजी मी फोन करून कळविले की, श्री. अवथरे सर हे होस्टेल मध्येच उदया दिनांक १२/०४/२०२३ रोजी पैसे घेवुन बोलाविले आहे.

आज दिनांक १२/०४/२०२३ रोजी सापळा कारवाई करण्याकरीता पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी राठोड यांना कळविल्या प्रमाणे लाचलचुपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली येथील पोलीस निरीक्षक श्री शिवाजी राठोड, शासकिय पंच व स्टाफसह शासकिय वाहनाने पोहोचुन पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी राठोड यांनी मला फोन लावुन फॉरेस्ट रेस्टहाऊस येथे बोलाविल्याने मी त्याठिकाणी हजर झालो. त्यानंतर मला पंचासमक्ष सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगुन माझी अंगझडती घेवुन पंचासमक्ष बंद लिफाफयातुन काढुन ॲथ्रॅसिन पावडर लावलेली लाचेची रक्कम माझे फुलपॅन्टचे समोरील उजव्या बाजुचे खिश्यात ठेवण्यात आली. सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन लोकसेवक यांनी स्वत: किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर दर्शनी भागी येवून रूमालाने चेहरा पुसावा असा इशारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणाऱ्यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले.

त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमोरी कार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच कं. १ यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे ताब्यात देवुन मला पंच कं.१ यांचे सह माझे स्वत:चे दुचाकी वाहन क. एमएच ३३/एक्स ८७०७ ने गैरअर्जदारास भेटण्यास मौजा भामरागड येथील समग्र शिक्षा होस्टेल येथे पाठविण्यात आले. तेव्हा गैरअर्जदार श्री. अवथरे सर हे होस्टलचे विश्रांती कक्षात हजर मिळुन आले. त्यांना भेटुन कामासंबधी बोलणी करून त्यांनी मला तुमचे पगारामध्ये वाढ केली आहे व तुमचा आर्डर जुन महिण्यात मिच काढतो, सर्वानी मला पाच–पाच हजार रूपये दिले आहे, तु मला ५०००/– दे असे बोलल्याने मी ॲथ्रॅसिन पावडर लावलेली रू. ५,०००/– लाचेची रक्कम माझे फुलपॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिश्यातुन काढुन श्री. अवतरे सर यांना दिले असता, त्यांनी लाच रक्कम रू. ५,०००/– हाताने स्विकारुन दोन्ही हाताने मोजुन हातामध्ये ठेवले. त्याचवेळी मी पंच कं. १ सोबत दर्शनी ठिकाणी येवुन सापळा पथकास माझे जवळील रूमाल काढुन चेहरा पुसून लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्याचवेळी सापळा पथकाने गैरअर्जदार श्री. अवथरे सर, अधिक्षक/मुख्यध्यापक समग्र शिक्षा अभियान होस्टेल भामरागड यांना रंगेहात पकडुन पुढील कारवाई केली. सापळा कार्यवाही बाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री शिवाजी राठोड यांनी पंचनामा कं. ३ मध्ये घेतल्या आहेत.

तरी लोकसेवक श्री. भिमराव उध्दव अवथरे वय ५३ वर्ष, पद अधीक्षक, समग्र शिक्षा अभियान वसतीगृह भामरागड ता. भामरागड जि. गडचिरोली यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून दरमहा ३००० रू. वाढ केल्याचा मोबदला व कंत्राटी चौकीदार पदावर नियीमत ठेवण्याचे कामाकरीता रू. ५०००/– लाच रक्कमेची मागणी करून रु. ५,०००/– रू. लाच रक्कम स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले. म्हणुन माझी त्यांच्याविरूध्द कायदेशीर फिर्यादि आहे.

माझी वरिल फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहीली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

(शिवाजी राठोड) PI

पोलीस निरीक्षक,

ला.प्र.विभाग, गडचिरोली

**Form : 1-C**

No. 0056706

Reasons for delay in reporting by the Complainant/Informant :
तक्रारदाराने/ खबऱ्याने तक्रार करण्यातील विलंबाची कारणे :

आवश्यक

9. Particulars of properties stolen/involved (Attach separate sheet, if necessary) :
चोरीस गेलेल्या/ अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यक असल्यास, स्वतंत्र कागद जोडावा) :

रुपये - 5,000/-, व मेमरी कार्ड.

10. *Total value of properties stolen/involved : रुपये - 5,000/-
चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य :

11. *Inquest Report/U. D. Case No., if any : —
मरणान्वेषण अहवाल/ यु. डी. प्रकरण क्र. जर असल्यास :

12. F. I. R. Contents (Attach separate sheets, if required ):
पहिल्या खबरीतील हकिगत (आवश्यक असल्यास, स्वतंत्र कागद जोडावेत) : बरना ता. वेळी व ठिकाणी यातील नमूद लोकसेवक आरोपी यांनी आपले पदाचा दुरुपयोग करुन स्वतः चे आर्थिक फायद्या करीता तक्रारदार यांना दर महा 3000/- रुपये पगार वाढ केल्याचा मोबदला व कंत्राटी चौकीदार पदावर नियमित ठेवण्याचे कामाकरिता रु.5000/- लाच रक्कमेची पंच साक्षीदारा समक्ष स्वीकार मागणी करुन रु.5000/- लाच रक्कम घेतांना आज रोजी मौजा-भामरागड येथे वस्तीगृहातील स्वत: चे पिंडीत कक्षात रंगेहात मिळुन आल्याने सदरचा गुन्हा आहे.

13. Action taken : Since the above report reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2, registered the case and took up the investigation/directed* .......... Rank .......... to take up the investigation/ Refused investigation/transferred to P. S. .......... on point of jurisdiction.
केलेली कार्यवाही : बाब क्र. २ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये अपराध घडल्याचे वरील अहवालावरुन दिसून आल्यामुळे प्रकरण नोंदवले आणि तपासाचे काम हाती घेतले शिवाजी राठोड यांना तपासाचे काम हाती घेण्याचा निर्देश दिला/ तपास करण्याचे नाकारले/अधिकारितेच्या पदनाम पोलीस निरिक्षक
मुद्यावर ला. प्र. वि. गडचिरोली .......... पोलीस ठाण्याकडे हस्तांतरीत केले.
F. I. R. read over to the Complainant/Informant /admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/Informant free of cost.
पहिली खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदवली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला प्रत मोफत दिली.

14. Signature/Thumb impression of the Complainant/Informant.
तक्रदाराची/खबरीची सही/अंगठ्याचा ठसा

Signature of the Office-in-charge, Police Station
पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याची सही

*Name : राहुल बोरकर
नाव

*Rank : पोउपनि .......... No. ..........
पदनाम .......... क्रमांक

15. Date & Time of despatch to the court : 13/04/2022
कोर्टात पाठविल्याची तारीख व वेळ